# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २६/०७/२०२४ (शुक्रवार) सायंकाळ**

---

## अवैध दारूची तस्करी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध धडक मोहीम

पोस्टे एमआयडीसी बोरी येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असता पोस्टे एमआयडीसी बोरी येथे बाजार चौक खापरी मोरेश्वर जाणाऱ्या रस्त्यावर थैलीमध्ये एक इसम देशी दारू घेवुन जात आहे. अशी माहिती मिळाल्याने रेड कारवाई करून **आरोपी नामे– राहुल दिगांबर तेलंग वय ३८ वर्षे रा. वार्ड क्र. ०४ टाकळघाट ता. हिंगणा जि. नागपुर** याची स्टाफचे मदतीने झडती घेतली असता ०६ निपा देशी दारू ७० रू प्रमाणे एकुण ४२० रू चा मुद्‌देमाल जप्त करून आरोपीविरूद्ध पोस्टे एमआयडीसी बोरी येथे कलम ६५ ई मदाका. प्रमाणे कारवाई करण्यात आली.

पोस्टे काटोल अंतर्गत **महिला आरोपी** हिच्या घरची दारूबाबत घरझडती घेतली असता १० निपा देशी दारू संत्री नं ०१ डिलक्स एकुण १८०० एम.एल. कि. ९०० रू चा मुद्‌देमाल विनापरवाना अवैधरित्या मिळुन आल्याने आरोपी विरूध्द पोस्टे काटोल येथे कलम ६५ (ई) म. दा. का. प्रमाणे कारवाई करण्यात आली.

## पो.स्टे. देवलापार हद्दीमधील जुगार अड्डयावर धाड
## —: नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई :—

दिनांक २५/०७/२०२४ रोजी पोस्टे देवलापार येथील स्टाफ पोस्टे हद्दीत अवैध धंद्यावर रेड संबंधाने पेट्रोलिंग करीत असतांना मुखबिरद्वारे विश्वसनीय खबर मिळाली की, पोलीस स्टेशन देवलापार हद्दीतील हिवराबाजार गावात रोडचे कडेला काही लोक ५२ तासपत्त्यावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगार खेळत असल्याची गोपनिय माहीती पोस्टे देवलापार येथील स्टाफ यांना प्राप्त झाले वरून सदर स्टाफ यांनी हिवराबाजार गावात रोडचे कडेला असलेल्या खाली जागेत सापळा रचुन छापा टाकुन **आरोपी नामे–१) दिपक मधुकर चौधरी वय ३० वर्ष रा. हिवराबाजार २) राकेश केवलचंद चौरे वय २८ वर्ष रा. वरघाट ३) ज्ञानेश्वर दिनेश डहरवाल वय २७ वर्ष हिवराबाजार ४) अनिल किसन बोमनोटे वय ३८ वर्ष रा. हिवराबाजार ५) निलेश उर्फ जॉन्टी बालचंद बागळे रा. हिवराबाजार ६) महेश नरेश चौरे, वय २३ वर्ष रा. वरघाट ७) दिपक गुरूदास पोरे वय २७ वर्ष ८) खुशाल राजु मंडलेकर वय २५ वर्ष रा. वरघाट** हे जुगार खेळतांनी मिळुन आले. एकुण ०८ जुगारी इसम यांना ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातुन ५२ तास पत्ते व नगदी १८५०/– रु चा मुद्देमाल जप्त करून आरोपीतांविरूध्द पोलीस ठाणे देवलापार कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर